**नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र**
**पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.**

## प्रेस नोट

**दिनांक ११/०७/२०२२ (सोमवार)**

**(सायंकाळ)**

---

## दुखापत

१) पो.स्टे. कोंढाळी :– अंतर्गत ०५ कि मी अंतरावरील मौजा चमेली येथे दिनांक ०९/०७/२०२२ चे १८.०० वा. दरम्यान फिर्यादी नामे– दिवाकर प्रभाकर नेहारे, वय २९ वर्ष, रा. चमेली ता. काटोल जि. नागपुर यांचे आरोपी क्र. १ च्या बहिणी सोबत प्रेम संबध असल्याने तिच्या बहिणीला भेटण्याकरीता तिच्या घरात गेला. तेव्हा तिच्या बहिणीच्या सासुने फिर्यादी यास घरात जातांना पाहिले. तेव्हा फिर्यादी तेथून पळून गेला. यानंतर आरोपी क्र. १ याने फिर्यादी यास 'तु माझ्या बहिणीच्या घरात कशाला गेला होतास?' या कारणावरून आरोपी क्र. २ सह फिर्यादीस शिवीगाळ करून हातबुक्कीने मारहाण केली. आरोपी क्र १ याने फिर्यादीस काठीने दोन्ही पायाच्या टोगळयाच्या खाली मारून जखमी केले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. कोंढाळी येथे आरोपीविरुध्द कलम ३२४, ५०४, ५०६ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरु आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास पोहवा दारासिंग राठोड मो.क्र. ९८६०४२७९०२ हे करीत आहे.

२) पो.स्टे. जलालखेडा :– अंतर्गत १५ कि.मी. अंतरावरील मौजा हिवरमठ येथे दिनांक ०९/०७/२०२२ चे २१.०० वा. दरम्यान फिर्यादी नामे– सुरेन्द्र काशीरामजी गणवीर वय ५० वर्ष, रा. हिवरमठ त. नरखेड हा मोठया भावाचे घराजवळ उभा असता आरोपी क्र. १. मधुकर पुडंलीक गणवीर, वय ४७ वर्ष, रा. हिवरमठ हा सुद्धा तिथे उभा होता. तेव्हा फियादींनी त्यास म्हटले की, 'तु माझा माणुस प्रकाश नेहारे याला चुकीचा सल्ला का देतो?' यावरुन आरोपी क्र. २. शुभम मधुकर गणवीर, वय २४ वर्ष, रा. हिवरमठ याने फिर्यादीला हातबुक्कीने मारहाण केली. तसेच आरोपी क्र २ याने घरी जावून हातात काठी आणली व फिर्यादीचे उजव्या हाताच्या अंगठयाजवळ टोपऱ्या जवळ डाव्या बाजुच्या छातीवर, मानेला व डोक्याचे मध्यभागी मारुन जखमी केले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. जलालखेडा येथे आरोपीविरुध्द कलम ३२४, ३४ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीतांना सुचनापत्रावर रिहा करण्यात आले आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास पोलिस नाईक तायडे मो.नं. ८३०८९६४७१४ हे करीत आहे.

## अकस्मात मृत्यू

पो.स्टे. काटोल :– अंतर्गत १५ कि. मी. अंतरावरील चिखली मैना शिवार येथे दिनांक २९/०६/२०२२ चे १६.०० वा. सुमारास **मोतीबाबा भाऊराव दुपारे (मृतक), वय ५५ वर्ष रा. चिखली मैना** यांनी अज्ञात कारणातुन स्वताच्या शेतात जावुन विषारी औषधी प्राषण केले. त्यामुळे त्यांची प्रकृती खराब झाल्याने त्यांना उपचाराकरीता प्रथम ग्रामीण रूग्णालय काटोल व नंतर मेयो हॉस्पीटल नागपुर येथे नेले असता उपचारादरम्यान दि. ०८/०७/२२ चे ००.३० वा. डॉक्टरांनी तपासुन मृत घोषीत केले. सदर मर्ग चे कागदपत्रे प्राप्त झाल्याने दाखल करून तपासात घेतला.

सदर प्रकरणी पोलिस हवालदार प्रदीप ठाकुर मेयो पोलिस बुथ नागपुर यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. काटोल येथे कलम १७४ जाफौ. कायद्यान्वये मर्ग नोंद केलेला असून पुढील तपास नापोशि अविनाश बाहेकर मो. न. ८३०८४०५३७३ हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर